# सातारा नगरपरिषद, सातारा

## वृक्षप्राधिकरण विभाग

## जाहिर आवाहन

२/- सातारा शहर नगरपरिषद हद्दीमधील सर्व मिळकत धारकांना तसेच शाळा, कॉलेज, खाजगी सामाजिक संस्था, सरकारी निमसरकारी कार्यालये, महामंडळे यांना सुचित करणेत येते कि सध्या मान्सुनपूर्व तयारीचा भाग म्हणून आपत्कालीन परिस्थितीत कोणताही वृक्ष मुळापासून उन्मळून पडून अथवा वृक्षाचा कोणताही भाग पडून जिवीत व वित्त हानी होऊ नये यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून आपल्या मालकीच्या मिळकतीमध्ये असणारे धोकादायक वृक्षांचा भार कमी करणेबाबत खालील अटीस अधिन राहून परवानगी देणेत येत.

१) वृक्षाचा भार कमी करताना वृक्ष मुळापासून तोडू नये.आणि वृक्ष मूळापासून तोडणेचे असलेस वृक्ष विभागाकडील विहीत नमुन्यात अर्ज करून रितसर परवानगी घेणेत यावी.
२) वृक्ष भार कमी करताना वृक्षांची उंची २० फूटापेक्षा कमी करणेत येवू नये.
३) वृक्षाचा भार कमी करणेच्या सबबीवर आपण वृक्ष २० फूटापेक्षा कमी उंची ठेवून वृक्ष तोडलेस आपणांवर झाडांचे संरक्षण व जतन १९७५ अन्वये कलम २१ प्रमाणे आपणांवर कायदेशीर कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.
४) आपले मिळकतीमधील वृक्षाचा भार स्वखर्चाने कमी करताना व कोणास इजा व जिवित हानी होणार नाही याची काळजी घेवूनच वृक्षाचा भार कमी करावा याची नोंद घ्यावी.
५) वरील जाहीर आवाहन फक्त अतिशय धोकादायक तसेच विस्तीर्ण वाढलेल्या वृक्षांसाठीच लागू आहे. वृक्षांची उंची, फांदया, विस्तार कमी करणेपूर्वी नगरपरिषदेस सदरच्या वृक्षांचे २ रंगीत छायाचित्रांसह तातडीन ८ दिवसांत लेखी स्वरुपात माहिती देणे गरजेचे आहे. सदरच्या निवेदनानुसार काही मिळकत धारकांनी अनावश्यक व विनापरवाना वृक्षतोड करू नये. पावसाळ्यामध्ये वादळ, वारा व पाऊस यांचेमुळे उन्मळून पडणेची शक्यता असलेले अथवा फांदयामुळे जिवित वा वित्त हानी होणेची शक्यता असलेल्या वृक्षांपुरतेच लागू राहील.

सही /-
(अभिजित बापट)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा.